अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : १४९ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२
www.surajyadigital.com । गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ ।



# भाऊंना मुंबईत 'बुस्टर'! भैय्यांना दिल्लीत 'कलस्टर'!

## मोहिते-पाटलांना टक्कर देण्यासाठी रामभाऊंना चिटणीसपदी संधी

## जवळीकीसाठी धैर्यशीलभैय्यांचा संसदीय गटात समावेश

✔ सोलापूर/प्रतिनिधी

अकलूजकर मोहिते-पाटील आणि माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्यामधील राजकीय हाडवैर आणि टोकाचा संघर्ष तसा सर्वश्रुत. याच टप्यावर मोहिते-पाटलांना टक्कर देण्यासाठी बळ म्हणून सातपुतेंना भाजपनं प्रदेश पातळीवर चिटणीस म्हणून संधी दिल्यावर २४ उलटतात ना उलटतात तोच या पक्षानं कट्टर विरोधक माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटलांचा 'बीजेपी'नं संसदीय मैत्री गटात समावेश केला. तथापि, प्रदेश आणि राष्ट्रीय भाजपकडून संधी देण्याच्या घडवण्यात आलेल्या या घडामोडींमुळं या पक्षाचं मोहिते-पाटील आणि सातपुतेंच्याबाबतीत नेमकं चाललंय तरी काय? या प्रश्नार्थक सवालावरुन सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय पटलावर चर्चांना सुरुवात झाली आहे. भाजपनं केलेल्या या दोघांच्या निवडीवरुन खुद्द या पक्षासह अन्य पक्षांमधील नेतेमंडळींच्या भुवया उंचावल्या आहेत.

भाजप विरोधक राहिलेल्या मोहिते-पाटील परिवारातील खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना दिल्लीतून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि केंद्रातील भाजप सरकारनं 'भारत आणि युएई' या दोन देशांमधील संबंध दृढ करण्याच्या दृष्टीनं मोठी संधी दिल्याचं मानलं जात आहे. रणजित मोहिते-पाटील हे भाजपकडून विधान परिषदेचे आमदार राहिले आहेत. आता धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या संसदीय मैत्री गटातील समावेशामुळे भाजपकडून कुठेतरी मोहिते-पाटील कुटुंबाशी असलेले राजकीय वैर मिटवण्याच्या पार्श्वभूमीवर, जवळीक साधण्याच्या भूमिकेतून टाकलेलं पाऊल तर नाही ना? अशी चर्चा देखील या निवडीच्या निमित्तानं केली जात आहे.

### डावपेचाचा भाग? समर्थकांत उत्साह

भाजपनं आपली साम दाम दंड भेद यांसह सर्व ताकद लावून लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटलांच्या घेतलेल्या भूमिकेमुळे माढा आणि सोलापूर या दोन्ही जागा गमवाव्या लागल्या होत्या. तसेच विधानसभेला सांगोला, माळशिरस, माढा आणि करमाळा या चार मतदारसंघांत भाजपला मोहिते पाटलांच्या विरोधामुळे मोठा फटका बसला होता. यानंतर नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही मोहिते-पाटील पॅटर्न चांगलाच चालला होता.दिल्लीतून धैर्यशील मोहिते-पाटील यांना संसदीय मैत्री गटातील सदस्यपदाचा मान आगामी काळात टाकल्या जाणाऱ्या डावपेचाचा भाग नाही ना अशाही चर्चांना उधाण आलं आहे. पण मोहिते पाटलांच्या समर्थकांमध्ये आनंद आणि उत्साह संचारल्याचं पाहायला मिळत आहे.

### हे कसलं राजकारण?



मोहिते-पाटलांचं निर्विवाद वर्चस्व संपवण्यासाठी माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच माजी आमदार राम सातपुतेंना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंबहुना प्रदेश भाजपकडून सर्वच आघाड्यांवर मोठी ऊर्जा' दिली जात आहे.मोहिते-पाटलांना राजकीयदृष्ट्या संपवण्यासाठी आतून डावपेचाच्या खेळ्या खेळल्या जात आहेत. त्यातच आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्याविरुद्ध कितीही तक्रारी करण्यात आल्या तरी पक्षीय आघाडीवर त्यांच्यावर कसलीच कारवाई होत नाही. आता तर मोदी सरकार आणि लोकसभेनं मोहिते-पाटील यांना संसदीय गटात घेऊन चांगलंच कुरवाळलं आहे. त्यामुळं एकीकडं आतून डावपेचाच्या खेळ्या अन् दुसरीकडून कुरवाळनं हे कसलं राजकारण? असा मुद्दा अकलूज परिसरात उपस्थित केला जात आहे.

### टोकाच्या संघर्षाच्या ट्रॅकवर 'दिल्ली'तून मोठी जबाबदारी

माढा लोकसभा निवडणुकीतला भाजपचा पराभव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चांगलाच जिव्हारी लागला होता. तो अद्यापही त्यांच्या मनाला बोचत असावा. मोहिते-पाटलांनी माढ्यात बेरजेचं राजकारण करत भाजपच्या रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांचा धक्कादायक पराभव केला होता. त्यानंतर मोहिते-पाटील विरुद्ध भाजप संघर्ष दिवसागणिक अधिकाधिक टोकदारच होत राहिला. विधानसभा निवडणुकीतही याचा प्रत्यय जवळून आला.पण याचदरम्यान, सोलापूर जिल्ह्यात ज्यांच्याशी भाजपचा आजतागायत तीव्र संघर्ष राहिला आहे,अशात खासदार धैर्यशील मोहिते-पाटलांवर 'दिल्ली'तून मोठी जबाबदारी सोपवण्यात आल्याची बातमी धडकली.

### लढवय्या रामभाऊंना 'बक्षिसी' दिली; कट्टर विरोधकांना सन्मान दिला

राम सातपुते यांच्याकडे राज्य चिटणीस पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. नव्या जबाबदारीमुळे भाजप संघटनेत सातपुते यांचे राजकीय वजन वाढल्याचे मानले जात आहे. सातपुते हे २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत आमदार झाले. आमदार असतानाच त्यांच्यावर भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली होती. दरम्यान, पक्षाच्या आदेशानुसार सातपुते यांनी सोलापुरातून लोकसभेची निवडणूक लढवली. मात्र, त्या निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. त्या लोकसभा निवडणुकीपासून मोहिते पाटील आणि माजी आमदार राम सातपुते यांच्यात उभा संघर्ष सुरू झाला. लोकसभेतील पराभावानंतर सातपुते यांनी माळशिरसमध्येच राहण्याचा निर्णय घेतला.विधानसभा निवडणुकीत त्यांनी मोहिते पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांच्या आघाडीला जोरदार टक्कर दिली. त्यांना अवघ्या काही हजार मतांनी पराभव पत्कारावा लागला. मात्र, त्यांनी जानकर यांना दिलेली लढत लक्षवेधी ठरली. विधानसभेनंतर नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक भाजपने सातपुते यांच्या नेतृत्वाखाली लढवली. अकलूज नगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत सातपुते यांच्या नेतृत्वाखाली भाजप उमदेवारांनी चांगली मते घेतली, तर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते ह्या दहिगाव गटातून जिल्हा परिषदेवर निवडून आल्या आहेत. त्यामुळे मोहिते पाटलांना निकराने टक्कर देणाऱ्या सातपुते यांना राज्य कार्यकारिणीवर स्थान देत पक्षाने त्यांच्या पाठीशी ताकद उभी केल्याचे मानले जात आहे. तथापि राम सातपुतेंनी मोठ्या संघर्षाचा सामना करीत भाजपसाठी प्रत्येक ठिकाणी खिंड लढवून नेतृत्वाची झलक दाखवली. सातपुतेंना संधी देऊन भाजपनं त्यांना जणूकाही बक्षिसी दिली. तुलनेत भाजपशी कट्टर वैर असलेल्या मोहिते-पाटलांनाही संधी दिली

**ही औपचारिक प्रक्रिया! :** ऑपरेशन सिंदूरनंतर भारतानं सर्वपक्षीय नेत्यांना विविध देशांत पाठवून देशाची भूमिका मांडण्यास सांगितलं होतं. यानंतर आता जागतिक पातळीवर भारताचे सर्व देशांसोबतचे राजकीय, आर्थिक यांसह विविध प्रकारचे संबंध अधिकाधिक दृढ व्हावेत यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्लांनी 'संसदीय मैत्री गट' स्थापन केला आहे.लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्थापन केलेल्या या संसदीय मैत्री गटामध्ये सत्ताधारी खासदारांसोबतच इंडिया आघाडीतील महत्वाच्या खासदारांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार, संजय राऊत, सुप्रिया सुळे आणि गौरव गोगोई हे देखील परदेशी दौर्यावर जाणार आहेत. या संसदीय मैत्री गटाचं सदस्यपद माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटलांना मिळालं आहे. ही एक औपचारिक प्रकिया आहे, सर्व पक्षांकडून त्यांच्या निवडक खासदारांची नावे मागवण्यात येतात आणि पक्षाने सुचवलेल्या सर्वच नावांचा समावेश संसदीय मैत्री गटात होतो. भाजपने कोणावर विशेष मेहेरबानी केली असा होत नाही, असे दिल्लीतील भाजपच्या वरिष्ठानी 'सुराज्य'शी बोलताना स्पष्ट केले.

---




### आजचे सामने

**दक्षिण आफ्रिका v/s वेस्ट इंडिज**
स्थळ : अहमदाबाद
वेळ : दुपारी ३ वाजता

**भारत v/s झिंबाब्वे**
स्थळ : चेन्नई
वेळ : सायंकाळी ७ वाजता

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दप्तर दिली तशी शिक्षक पण द्यावेत !

कल्याण
250-71-489
मुंबई
779-32-778
3 0 6

# डीसीपी भडकले आमदार रोहित पवारांना सुनावले

## नाही घेणार एफआयआर काय करायचे ते करा...



✔ मुंबई/प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी डीजीसीएविरोधात मरिनड्राईव्ह पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेलेले आमदार रोहित पवार आणि आमदार अमोल मिटकरी यांच्यात बुधवारी भर पोलीस ठाण्यातच जोरदार खडाजंगी झाली. पोलिसांनी डीजीसीएविरोधात तक्रार दाखल करुन घ्यायला नकार दिला आहे. त्यामुळे रोहित पवार प्रचंड संतापले. यावरुन पोलीस उपायुक्त प्रवीण मुंडे आणि रोहित पवार यांच्यात शाब्दिक चकमकी उडाल्या. तरीही पोलिसांनी रोहित पवार यांची एफआयआर दाखल करुन घ्यायला नकार दिला. त्यामुळे हे प्रकरण आता चिघळण्याची शक्यता आहे.

मंगळवारी डीजीसीएने व्हीएसआर कंपनीवर कारवाई केल्याचे पत्रक काढले. त्यानुसार व्हीएसआर कंपनीच्या २५ पैकी फक्त ५ विमानांवर कारवाई करण्यात आली आहे. एफआयआर करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. नवीन पीएनएस कायद्यानुसार हा दखलपात्र गुन्हा ठरतो. या महाराष्ट्रातील मोठा नेता विमान अपघातात गेला आहे. त्यासाठी ते एफआयआर करण्यासाठी गेले होते. मरिनड्राईव्ह पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि आ.पवार,आ.मिटकरी यांच्यात वादावादी झाली. एक कनिष्ठ पोलीस अधिकारी म्हणाला एफआयआर दाखल होऊ शकत नाही. मग आमच्या वकिलांनी त्यांनी नवा पीएनएस कायदा समजावून सांगितला. त्यानंतर पोलिसांनी एफआयआर नोंदवून घेण्यासाठी लॅपटॉप आणला. माझे स्टेटमेंट टाईप करायला सुरुवात होणार होती. इतक्यात एक मोठा पोलीस अधिकारी तिकडे आला आणि त्याने सांगितले, एफआयआर दाखल करुन घेणार नाही. त्याावर आम्ही पोलिसांना म्हणालो की, एफआयआर दाखल करणे आमचा अधिकार आहे. त्यावर डीसीपी प्रवीण मुंडे म्हणाले की, तुम्हाला जे करायचे ते करा, आम्ही एफआयआर घेणार नाही. ज्याला सांगायचेय त्याला सांगा, जिथे जायचेय तिकडे जा, जी कारवाई करायचेय ती करा. पण आम्ही एफआयआर नोंदवू शकत नाही. या डीसीपीला कोणाचा फोन आला होता, असा सवाल रोहित पवार यांनी विचारला.

पोलीस आम्हाला डीजीसीएविरुद्ध तक्रार का दाखल करुन देत नाही? आधी दाखल करायला घेतली, मग ती रद्द का केली? याप्रकरणात १०० टक्के एफआयआर दाखल होऊ शकतो. मग आम्हाला का थांबवले जात आहे. एरवी चोरी झाली, धडक बसली तरी दाखल होतो, दिल्लीतील कार्यक्रमात काँग्रेस कार्यकर्त्यांनी शर्ट काढला तरी दाखल केला जातो. मग अजितदादांच्या मृत्यूप्रकरणी दाखल का होऊ शकत नाही? अजितदादांसोबत वेगळा न्याय का?, असा सवाल पवार यांनी उपस्थित केला.

आज सकाळी आम्ही बारामती येथे जाऊन विमानतळाचा परिसर ज्यांच्या अंतर्गत येतो, त्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करु. सत्तेतील नेते आता या सगळ्यावर काय भूमिका घेतात, हे बघावे लागेल. महाराष्ट्रातील जनता आणि अजितदादांच्या पक्षाचे आमदारही याविरोधात लढत आहेत. पण ज्यांच्याकडे अधिकार आहेत, ते पुढे काय येत नाहीत? राज्याच्या उपमुख्यमंत्र्याला न्याय मिळत नसेल तर सामान्य माणसाने काय करायचे, असा सवाल पवार यांनी विचारला.

### अमोल मिटकरींचा इशारा

झारखंडच्या छपरामध्ये अपघातानंतर एआयबीने तत्काळ कंपनीच्या कार्यालयावर छापा टाकला आणि चौकशी सुरू केली. तितकीच तत्परता व्हिएसआर संदर्भात का दाखवली जात नाही? असा संतप्त सवाल राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरींनी केला आहे. या संदर्भात थातूरमातूर कारवाई करून चालढकल करण्याचा डीजीसीए प्रयत्न करत असेल तर महाराष्ट्राच्या जनतेचा जनक्षोभ अजून वाढेल, असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी दिला आहे. एक महिन्यानंतर हा अहवाल दिला, तीन आठवड्यानंतर ब्लॅक बॉक्स सापडला. सुमित कपूर संदर्भात डीजीसीए एक शब्द काढला नाही. या कारवाईने आम्ही समाधानी नाही. डिजिसीएच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यदाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणीही केली आहे.

# स्कार्पिओ गाडीची काच फोडल्याने एकाचा खून

## तिघांवर गुन्हा; दहिटणे येथील घटना

✔ मोहोळ/प्रतिनिधी



स्कार्पिओ गाडीची काच फोडल्याचा राग मनात धरून दोघा भावांनी एकास गंभीर मारहाण करून त्याचा खून केला. त्याचे प्रेत वाळूज येथे नदी पात्रात टाकले. याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात तिघांवर खुनाचा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बार्शी तालुक्यातील दहिटणे येथे २१ रोजी रात्रीच्या सुमारास घडली. विजय झगजाप असे खून झालेल्या व्यक्तिचे नाव आहे.

दहिटणे येथील विजय झगजाप हे आई-वडील, पत्नी दोन मुलांसह राहतात. त्यांची पत्नी मजुरीच्या कामासाठी मुलांना घेऊन पुणे येथे गेली होती. दरम्यान २१ फेब्रुवारी रोजी पहाटे दीडच्या सुमारास दीपक कोळी व भुजंग कोळी (दोघे. रा. दहिटणे) यांच्या स्कार्पिओ गाडीची काच फोडल्याप्रकरणी विजय यास दोघांनी काठीने मारहाण करत जातीवाचक शिवीगाळ केली होती. त्यानंतर विजय यांचा भाऊ योगेश झगजाप याने दीपक कोळी व भुजंग कोळी या दोघांना तुमच्या गाडीचे नुकसान भरून देतो, असे सांगितले होते. त्यानंतर विजय याला समजावून सांगून एका खोलीमध्ये बसवून बाहेरून कडी लावली होती. त्यानंतर योगेश याला झोप लागली. पहाटे तीनच्या सुमारास त्याला जाग आली. तो विजय यास बघण्यासाठी गेल्यानंतर तो त्या रूममध्ये नव्हता. योगेशने विजयची सगळीकडे शोधाशोध केली. मात्र तो मिळून आला नाही. दरम्यान विजयची पत्नी कोमल पुण्यावरून आल्यानंतर तिनेही विजयची शोधाशोध केली.

यानंतर कोमल या दीपक कोळी, भुजंग कोळी यांच्याकडे दीपक बाबत चौकशी करण्यासाठी गेल्या असता दोघांनी कोमल जगझाप यांना जातीवाचक शिवीगाळ केली. त्यानंतर जगझाप कुटुंबियांनी २३ फेब्रुवारी रोजी वैराग पोलीस ठाण्यात विजय जगझाप यांची हरवल्याबाबत तक्रार दाखल केली. त्यानंतरही त्यांचा शोध चालूच होता. दरम्यान २४ फेब्रुवारी रोजी सकाळी विजयचे प्रेत मोहोळ तालुक्यातील वाळूच्या नदीमध्ये आढळून आले. याप्रकरणी कोमल विजय जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दीपक कोळी, भुजंग कोळी, निर्मला कोळी या तिघांवर मोहोळ पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.